राधानगरी तालुक्यातील एकूण ९ गावांमध्ये तलाठी कार्यालये एवं निवासस्थान बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीएलडी - २०१७/प्र.क्र.१५०/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ:- विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. कार्या-१/सा.प्र.१/अवेट/०२/९७, दिनांक १६/०८/२०१७.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन पत्रान्वये पुणे जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील एकूण ९ गावांमध्ये तलाठी कार्यालये एवं निवासस्थान बांधकामासाठी येणाऱ्या रु.१,०१,७३,८००/- खर्चाच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

२. सदर इमारत बांधकामाचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी सन **२०१६-१७** च्या पुणे प्रादेशिक विभागाच्या दर सुचीवर आधारित रु.१,०१,७३,८००/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रक विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दि.१६/०८/२०१७ च्या पत्रान्वये शासनास अग्रेषित केले आहे.

शासन निर्णय:-

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील एकूण ९ गावांमध्ये तलाठी कार्यालये एवं निवासस्थान बांधकामाच्या अंदाजपत्रकांची सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तपासणी केल्यानंतर सदर बांधकामाच्या सहपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रत्येकी रु.१,०७,२७,०००/- याप्रमाणे ९ तलाठी कार्यालये एवं निवासस्थान बांधकामाच्या एकूण रु.१,०७,२७,०००/- (रुपये एक कोटी सात लाख सत्तावीस हजार फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधीन राहून शासन प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे:-

अटी व शर्ती-

अ) प्रस्तुत कामाच्या अंदाजपत्रकावर व नकाशांवर उपभोक्ता विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षाकन करणे आवश्यक आहे.

ब) सदर कामाचे अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

क) प्रस्तुत नस्तीसोबत राधानगरी तालुक्यात एकूण ९ गावांत वरीलप्रमाणे बांधकामे करावयाची प्रस्तावित आहे. तथापि नस्तीसोबत स्वतंत्र अंदाजपत्रके सादर केली आहेत. परंतु नस्ती एक करुन सादर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने निधी उपलब्ध असल्यास एकत्रित प्रशासकीय मान्यता देऊन

क्षेत्रीय स्तरावर योग्य माहिती प्राप्त करुन घेऊन कमाचे नियोजन करावे किंवा निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता करुन काम हाती घेणे सोईचे आहे. अन्यथा कामनिहाय प्रशासकीय मान्यता करणे उचित वाटते तरी याबाबत उपभोक्ता विभागाने योग्य ते ठरवावे.

२. सदर मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-२०१३/प्र.क्र.-३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ मधील भाग- पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र.१३४ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर इमारत बांधकामासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८ ४०५९ - सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९) (०७) (०२) आस्थापना खर्च (४०५९ ०८०५) (०७)(०३) हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)” या उद्दिष्टाखाली चालू आर्थिक वर्षी उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर कामाची सुरुवात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे. उक्त लेखाशिर्षाखाली प्रस्तावित बांधकामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढीलप्रमाणे राहील.-

आर्थिक वर्ष	या आदेशांतील बांधकामाचा अपेक्षित खर्च (रु. कोटी)	उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या इतर कामांसाठी आवश्यक तरतूद (रु. कोटी)	एकूण मंजूर तरतूद (रु. कोटी)
१.	**२.**	**३.**	**४.**
२०१७ - १८	०.१०७३	४०.८४८७	१०४.४९९८
२०१८ - १९	०.३२१८	८३.३०९७	११४.९४९८
२०१९ - २०	०.३२१८	६४.१२५३	१२६.४४४८
२०२० - २१	०.३२१८	३५.५९३२	१३९.०८९२

५. उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.-

(रु. हजारात)

अ.क्र.	**कामाचे नाव**	**एकूण अपेक्षित खर्च (रु.)**	**मागील वर्षाअखेर झालेला खर्च (रु.)**	**चालू वर्षात अपेक्षित खर्च (रु.)**	**पुढील वर्षासाठी Carry Forward करावयाची तरतूद (रु.)**		
१.	**२.**	**३.**	**४.**	**५.**	**६.**		
					अ	**ब**	**क**
	महसूल विभागातील **१९६** कार्यालयीन इमारतींची बांधकामे	६२९२००१	४१९७०३८	४०८४८७	८३३०९७	६४१२५३	३५५९३२

६. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९७/इमा-३, दि.०२/११/२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२२२१३३४०२९३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2018.02.22 13:47:52 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
२) जिल्हाधिकारी, पुणे.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा - कोल्हापूर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, कोल्हापूर, जि. कोल्हापूर.
६) उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई - ३२.
७) उप सचिव, नियोजन विभाग, कार्यासन -१४७५, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव, वित्त विभाग, कार्यासन व्यय-९, मंत्रालय, मुंबई-३२.
९) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

(शासन निर्णय क्र. बीएलडी-२०१७/प्र.क्र.१५०/ई-८, दि. २२ फेब्रुवारी, २०१८ चे सहपत्र)

"सहपत्र-अ"

Name of Work: Construction of 9 Talathi office Buildings in Taluka Radhanagari, Dist. Kolhapur.

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Village Name		Total Amount (Rs.) of work
1	Sarawade		836740.00
2	Tarale Khurad		819955.00
3	Avali Budruk		837975.00
4	Durgmanwad		830007.00
5	koulav		807249.00
6	Aini		826646.00
7	Kapileshwar		805881.00
8	Rashiwade Budruk		832722.00
9	Piral		849308.00
Total			**7446483.00**
	Add 5% Centage Charges	Rs.	372324.00
	Add 4% contigencies	Rs.	297859.00
	Add 5% Water Supply	Rs.	372324.00
	Add Fire Exeingusher Lumsum	Rs.	90000.00
	Add Rain Water Harvesting Lumsum	Rs.	180000.00
	Add 11% Electrification	Rs.	819113.00
	Total	**Rs.**	**9578103.00**
	Add 12% G. S. T.	Rs.	1149372.00
	Net Amount	**Rs.**	**10727475.00**